# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २३/११/२०२३

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा ९९४/२३ कलम ३२६,३४ भादवि | फिर्यादीचे राहते घरासमोर अवधुत महाराज मंदीर जवळ बेनोडा अमरावती | घ.ता.वेळ दि.२२.११.२०२३ चे २३.०० वा दा.ता.वेळ दि.२३.११.२०२३ चे ०२.३२ वा. | चेतन सुभाष लोंखडे वय २५ वर्ष रा. अवधुत महाराज मंदीर जवळ बेनोडा अमरावती | १.सचिन राजु काळे २.प्रविण राजु काळे | हकीकत अशाप्रकारे आहे की दि.२२.११.२०२३ रोजी ११.०० वा सुमारास मी माझ्या घराच्या दोन घर बाजुने राहणारा सचिन राजु काळे हा माझ्या घरासमोर आला व त्याने मला आवाज देवुन घराबाहेर बोलाविले आणि मला सांगितले काय करत आहे मी त्याला सांगितले की मी जेवन करायला बसणार होतो. तेवढयात त्याने माझ्या सोबत बोलता बोलता काही कारण नसतांना जोरात धक्का मारला त्यामुळे मी बाजुला असलेल्या नालीत खाली पडलो. तेवढयात माझा मोठा भाऊ नामे सतीश लोखंडे हा आला आणि त्याने सचिन काळे यास विचारले की तु माझ्या भावाला का ढकलला असे बोलताच सचिनचा मोठा भाऊ प्रविण राजु काळे हा तेथे आला आणि त्याने माझा भाऊ सतीश चे मागुन दोन्ही हात पकडले व सचिन काळे याने त्याचे कमरेतुन चाकु काढुन माझ्या भावाचे छातीवर डाव्या बाजुने चाकु खुपसला. त्यामुळे माझा भाऊ खाली जमीनीवर पडला. तेवढयात माझी नातेवाईक नामे ही मध्ये आली.आणि तिने सचिने चे हातातुन चाकु पकडण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे माझ्या नातेवाईक उजव्या हाताचे करगडीला चाकु लागला तेव्हा मी तेथे हजर होतो. आम्ही आरडाओरड केली त्यामुळे सचिन राजु काळे व प्रविण राजु काळे हे दोघेही तेथुन पळुन गेले. तेथे त्यावेळी आजुबाजुला राहणारे लोक जमले होते. मी माझा सतिश लोखंडे याला जखमी अवस्थेत माझा मित्र सुनिल लोखंडे याचे मदतीने माझे दुचाकीवर बसवले व माझा भाऊ सतिश ला माझी आई व माझ्यामध्ये बसवुन मी दुचाकीने सतीशला नेवुन इर्विन दवाखान्यात भरती केले. त्यानंतर पोस्टेला माहीती देण्यात आली. व माझे सोबत पोलीस इर्विन दवाखान्यात आले. त्यानंतर मी पोस्टेला परत आलो. माझा भाऊ सतीश लोखंडे याचे छातीवर चाकु मारुन सचिन राजु काळे व त्याचा भाऊ प्रविण राजु काळे रा. बेनोडा अमरावती यांनी जखमी केले म्हणुन मी त्या दोघाविरुध्द तक्रार देत आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व मेडीकल सर्टीफिकेटवरुन गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पो.स्टे. फ्रेजरपुरा ९९५/२३ कलम ३२४,३२३, ५०४,३४ भादवि | बेनोडा जहागीर अमरावती | घ.ता.वेळ २२.११.२०२३ चे २२.०० वा दा.ता.वेळ २३.११.२०२३ चे ०२.५७ | प्रविण राजु काळे वय ३० वर्ष रा. बेनोडा जहागीर अमरावती | १.चेतन सुभाष लोंखडे २.सतिश लोखंडे दोन्ही रा. बेनोडा जहागीर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी यांनी पोस्टेला येवुन जबानी रिपोर्ट दिला की, दि. २२.११.२०२३ रोजी १०.०० वा चे सुमारास मी घरी हजर होता. माझे वडील राजु हरीभाऊ काळे वय ६० वर्ष हे तंबाखु चुना पुडी आणण्याकरीता किराणा दुकानात जात असतांना मोहल्यातील चेतन लोखंडे व सतिश लोखंडे यांनी माझे वडीलांना दारु पिण्याकरीता पैसे मागितले. त्यांनी पैसे नाही आहे म्हटले असता त्यांनी त्यांना शिवीगाळ करुन वाद करुन लाथा बुक्यानी मारहाण केली. भांडणाचा आवाज आल्याने मी धावत तेथे गेलो बसता चेतन लोखंडे व सतिश लोखंडे यांनी हातात चाकु घेवुन चेतन लोखंडे याने त्याच्या हातातील चाकु माझे वडीलाचे उजव्या हातावर मारुन जखमी केले. तसेच सतीश लोखंडे याने माझे अंगावर त्याच्या हातातील चाकुने वार केलो तो मी माझ्या हाताने अडविला तर माझे उजवे हाताचे बोटांना मार लागुन जखमी झालो त्यानंतर मी माझ्या वडीलांना घेवुन रिपोर्ट देण्याकरीता पोस्टेला आलो त्यांच्यावर कार्यवाही व्हावी सदरचा गुन्हा दाखल |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

घरफोडी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे गाडगे नगर अमरावती<br>अप क्र १३८८/२३ कलम ४५४,४५७ ,३८० भादवि | आझाद नगर राहते घरी अमरावती | दि १८-११-२३ चे १५-०० वा ते १९-११-२३ चे ०५-३० वा दरम्यान<br>२३-११-२३ चे १३-१३ वा | अशफाक शहा शौकत शाह वय ४९ वर्षे रा आझाद नगर अमरावती | अज्ञात इसम | यातील नमुद घ ता वेळी व ठिकाणी यातील आरोपी हे नातेवाईक चे लग्न असल्याने परीवारासह वर्धा येथे गेले होते त्यांनी लग्नाला जाणेआधि घराला कुलुप लावुन गेले होते त्यापुर्वी त्यांनी त्यांचे कडील दोन बकरीचे पिल्लु बाजारात १३०००/-रु मध्ये विक्री केले आणी बिसी ५०००/- रु असे एकुण १८०००/-रु कपड्याचे असमारी मध्ये छोट्या लॉकर मध्ये ठेवले होते त्याला लॉक नव्हते . फि हे दि १९-११-२३ चे ०५-३० वा लग्नावरुन घरी परत आले असता घराला लटक दिसले नाही व घरात प्रवेश करुन पाहीले असता घरात सर्व सामायन अस्ताव्यस्ता दिसुन आले व फि यांनी कपाटात पाहीले असता ठेवलेले नगदी पैसे दिसुन आले नाही अश्या फि चटे जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल दि २३-११-२३ चे १४-०० वा ते १४-३० वा दरम्यान |

➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे राजापेठ अप क्र ९८७/२०२३ कलम ३७९ भादवी | शंकर नगर अमरावती | घ.ता.वेळ दि. २२/११/२०२३ चे २२ -३० वा ते दि. २३/११/२०२३ चे ०७-०० वा.<br><br>दा.ता.वेळ दि. २३/११/२०२३ चे १२-३५ वा. | हरप्रितजोगेंद्रसिंग बग्गा वय ४५ वर्ष रा. शंकरनगर | हकीकत अशा प्रकारे आहे नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ने त्याच्या दोन सायकली अंगणात लॉक करून रात्री झोपले व सकाळी उठले असता त्यांनी लॉक करून ठेवलेल्या सायकली १)ए वन ट्राईब जी एन आर फ्रेम नंबर १८f५५२४३२ ब्लॅक रंगाची सायकल कि.अं. ४४०० रू.<br><br>२)ए वन वाका वाका FFDD,२६Tcm फ्रेम नंबर २३f६५९८२१ ब्लॅक ग्रीन रंगाची सायकल कि.अं. ६५०० रू. अशा एकुण १०,९०० रू. ह्या दिसुन आल्या नाही . रात्री दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्या. अशा फिर्यादी चे जबाणी रिपोर्ट वरुण सदरचा गुन्हा दाखल |
| १. | पो.स्टे. बडनेरा, अप क्र. ८०८/२३ कलम ३७९ भादवी. | कोडेश्वर पॉईट जवळील तुळजाभवनी पेट्रोलपंपाजव ळ बडनेरा | गु. घ. ता. वेळ - दि. १८/११/२०२३ चे ०९/०० ते दि. १९/११/२०२३ चे ०९/३० वा.<br><br>दाखल वेळ - दि. २३/११/२०२३ चे ११/५२ वा. | श्री राजु बंडुजी चौखट वय-५२वर्ष धंदा- विटभटटी रा-गोपालनगर अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की फिर्यादी नामे यांनी रि दिला की, त्यांचे मालकीचा टाटा कंपनीचा १०चक्र का ट्रक कि.अ.७लाख रु चा कोणीतरी अज्ञात चोरटयाने दि.१८/११/२३ चे रात्री ०९/०० वा ते दि.१९/११/२३ चे सकाळी ०९/३० वा दरम्यान सुपर हायवे रोडवरील कोंडेश्वर पॉईट जवळील तुळजाभवानी पेट्रोलपंप जवळुन चोरुन नेला आहे. अशा फि चे रि वरुन पो स्टे अप क्र ८०८/२३ कलम ३७९ भदवीप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या मुदेमालाचे वर्णन ख लीलप्रमाणे आहे.अशा फि. चे रिपोर्ट वरुन पो. स्टे ला अप क्र. ८०५/२३ कलम ३७९ भादवी. प्रमाणे गुन्हा दाखल |

➢ इतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे राजापेठ अप क्र ९८८/२०२३ कलम २८९ भादवी | अमरावती | घ.ता.वेळ दि. २२/११/२०२३ चे १९ -३० वा<br><br>दा.ता.वेळ दि. २३/११/२०२३ चे १४-२४ वा. | एक महिला | उमेश कोठारे अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे यातील फिर्यादी चा नातलग जखमी रियांश वय ०९ वर्ष हा दोन दिवसापुर्वी दिवाळीनिमित्य फिर्यादीचे घरी आला होता. नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी शेजारी राहणारे आरोपी उमेश कोठारे यांचा पाळीव कुत्रा हा त्यांनी बाहेर फिरण्याकरीता आणला असता आरोपीचे हातातुन कुत्रा सुटुन त्याने रियांश हा घरासमोर खेळत असतांना त्याचे डाव्या पायाला चावा घेतला.आरोपीचे हलगर्जीपणामुळे सदर कुत्र्याने चावा घेतला. अशा फिर्यादी चे जबाणी रिपोर्ट वरुण सदरचा गुन्हा दाखल |

प्रोव्हिशन :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पो.स्टे कोतवाली | अप न ५४३/२३ क ६५ ई मदाका | जयस्तंभ चौक अमरावती | दि २२/११/२३ चे २२/१५ वा | २३/११/२३ चे ०२.४७ वा | ASI राजेश सपकाळ ब नं ६२४, पोस्टे सिटी कोतवाली अमरावती शहर | अमोल गणेशराव आठवले, वय ३२ रा बौद्ध मुर्ती जवळ, महाजनपुरा अम | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घ ताव वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी याचे जवळ मिळालेल्या खबरेप्रमाणे एक ईसम जयस्तंभ चौक अमरावती रोड येथे जुपीटर गाडी ने अवैदयारीत्या रित्या दारु विक्री करीत धेवुन जात आहे अशी खात्रीलायक बातमी वरुन आम्ही पो. स्टाफ व पंच सह सदर घटना स्थळी गेलो असता तथे खाजगी वाहनाने जयस्तंभ चौक अमरावती .येथे गेलो असता एक ईसम जुपीटर गाडी ने अवैदयारीत्या रित्या दारु विक्री करुन घेवुन जात असतांना दिसुन आला, त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव अमोल गणेशराव आठवले, वय ३२ रा बौद्ध मुर्ती जवळ, महाजनपुरा अम असे सांगीतले त्याचे ताब्यातील ज्युपीटर गाडी हिरव्या रंगाची MH27DD 7729 ची पाहणी केली असता गाडीते डिक्कीमध्ये 10 ROYAL STAG, 180 ML काचेची बॉटल 1800/- रु ओफिसर चॉईस ब्यु 180ML10 काचेची 1500/-एकुण 20 नग व गाडी समोर TUBORG12 नग एक बॉक्स मध्ये 2280 रू. एक जुपीटर गाडी कि. 70,000/ रु. असा एकुण - 75,580 रु चा प्रोव्ही माल मिळुन आला यांचे कृत्य क ६५ (ई) महा.दारूबंदी कायदा प्रमाने होत असुन सदरचा गुन्हा दाखल |